EST. 1970

MAHARASHTRA SHIKSHAN SAMITI'S

# MAHARASHTRA MAHAVIDYALAYA, NILANGA

(Arts, Commerce, Science, Information Technology & Vocational)

**Re-Accredited "B+" Grade (CGPA-2.62)**

NILANGA – 413521 Dist. Latur (Maharashtra State)

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA NILANGA 413 521 Dist.Latur

**DR. M.N. KOLPUKE**
M.Sc. Ph.D.(Zoology)
**Principal**

## Extension of firsthand knowledge in Shaping NSS Magazine of SRTM University

## During the academic Year 2021-2022 & 2022-23

| Name of the Activity | Year | Published by |
|---|---|---|
| Extension of firsthand knowledge in Shaping NSS Magazine of SRTM University | 2021-23 | SRTM Univeristy, Nanded |

**A Brief Report:** In this "शमतीर्थ" (Name of the Magazine) Special Biennial (2021-23) NSS Magazine of [ SRTM University, Nanded. Two articles are written in Marathi Language by our faculty Dr. S. G. Benjalwar. In his first article he had tried to explain how NSS is a School without Chalk and Board. He has poured his both knowledge and experience in writing this article. And in his second article Dr. S. G. Benjalwar tried to explain what is Pfms & ZBSA account which is an essential part of NSS unit in any college. He has shared his understanding of both these concepts' and how to maintain it. The third article is written by our student Miss Late Ashwini who remained a NSS Volunteer. She shared her experience as a student and importance of NSS in shaping life of students

## Outcomes:

1. Two scholarly articles are contributed by our faculty Dr. S. G. Benjalwar to NSS Magazine of SRTM University, Naned.
2. Extended experience in shaping the Magazine.
3. Extended support to one NSS Volunteer i.e. our student Miss Late Ashwani in contributing one article to the same Magazine

Principal
Maharashtra Mahavidyalaya
Nilanga-413521 Dist.Latur

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आझादी का अमृत महोत्सव

## राष्ट्रीय सेवा योजना

**Not Me, But You**

# श्रमतीर्थ


द्विवार्षिकांक २०२१-२३








आत्मनिर्भर युवकांसाठी...



Cover Page

130

# मोडेन पण वाकणार नाही



## प.पू.स्वामी रामानंद तीर्थ

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

# आझादी का अमृत महोत्सव निमित्त राबविलेल्या उपक्रमाची क्षणचित्रे












आव्हान-2022 राज्यस्तरीय उत्कृष्ट जिल्हा पुरस्कार



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आयोजित आव्हान-२०२२ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत लातूर जिल्ह्यास सर्वोत्कृष्ट जिल्हा म्हणून सन्मानिय करण्यात आले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी, संघ व्यवस्थापक डॉ.केशव आलगुले व स्वयंसेवक.

राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष-२०२३
उत्कृष्ट शिस्तप्रिय संघ पुरस्कार



पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर येथे आय राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा उत्कर्ष २०२२-२३ चे पारित स्विकारताना संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी व संघ व्यवस्थापक डॉ.मारुती लुटे आणि विद्यार्थी.

# कुलपती



**मा.रमेश बैस**

(विद्यमान राज्यपाल, महाराष्ट्र राज्य)

# श्रमतीर्थ व्दिवार्षिक अंक २०२१ - २०२३
## संपादक मंडळ



मा. कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या समवेत कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, प्र. वित्त व लेखाधिकारी मा.मोहम्मद शकील, श्रमतीर्थ व्दिवार्षिक अंक २०२१ - २३ संपादक व संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी, माजी संचालक डॉ.शिवराज बोकडे, संपादक मंडळ सदस्य डॉ.केशव आलगुले, डॉ.दयानंद गुडेवार, डॉ.प्रल्हाद भोपे, डॉ.सुरेश भालेराव, डॉ.मारुती लुटे, डॉ.सुर्यप्रकाश जाधव, डॉ.एस.एस. नगरकर, डॉ.दत्ता कुंचलवाड व उपस्थित डॉ.प्रकाश सुर्वे, डॉ.अरूण पडघण.

### राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयीन कर्मचारी



श्री. ए. आय. शेख
(लिपीक)



श्री. टी.के. हंबर्डे
(सेवक)

List of Articles

# श्रमतीर्थाचे थेंब...


| अनुक्रमणिका | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ➢ संपादक मंडळ, संपादकीय | 2-3 |
| ➢ मा. कुलगुरु महोदय शुभेच्छा संदेश... | 4 |
| ➢ क्षेत्रीय संचालक रा.से.यो कार्यालय पुणे शुभेच्छा संदेश... | 5 |
| ➢ राज्य संपर्क अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना शुभेच्छा संदेश... | 6 |
| ➢ **Massage of NSS ETI Director...** | 7 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना शैक्षणिक वर्ष 2021-22, 2022-23 संक्षिप्त अहवाल | 8-12 |
| ➢ राज्यस्तरीय पुरस्कार वर्ष 2021-22 | 13 |
| ➢ विद्यापीठ स्तरीय पुरस्कार वर्ष 2021-22, 2022-23 | 14 |
| ➢ जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व प्रशिक्षण शिबीर | 15-20 |
| ➢ नांदेड जिल्ह्यातील रा.से.यो ची वाटचाल | 21-53 |
| ➢ अमृत महोत्सव ते वन महोत्सव | 54 |
| ➢ लातूर जिल्ह्यातील रा.से.यो ची वाटचाल | 55-97 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मतेसाठी एक सशक्त साधन | 98 |
| ➢ परभणी जिल्ह्यातील रा.से.यो ची वाटचाल | 99-125 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना : संस्कार केंद्र | 126 |
| ➢ हिंगोली जिल्ह्यातील रा.से.यो ची वाटचाल | 127-145 |
| ➢ आपत्तींना कवेत घेण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे शिबीर आव्हान -2022 | 146-148 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना- व्यक्ती व्हाया समष्टी मु. पो. राष्ट्र | 149-151 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना संस्कार केंद्र | 152-153 |
| ➢ ना खडू न फळा रासेयो बिनभिंतीची शाळा | 154-156 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना आणि व्यक्तीमत्व विकास | 157-158 |
| ➢ श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणारी राष्ट्रीय सेवा योजना | 159-160 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजनेची ग्रामीण विकासातील भूमिका | 161-163 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजनेतून एकात्मता आणि राष्ट्रप्रेम निर्माण होते | 164-166 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास | 167 -169 |
| ➢ राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबीर-२०२२ चिखलदरा | 170-172 |
| ➢ **SUCCESS STORY** | 173-174 |
| ➢ युवा संसद एक अविस्मरणीय अनुभव | 175 |
| ➢ राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी जीवनास वळण देणारे दिवस | 176 |
| ➢ संस्मरणीय राष्ट्रीय एकात्मता शिबीर | 177-178 |
| ➢ PFMS प्रणाली एक अनुभव | 179-186 |
| ➢ अनुभवांना गाठीशी बांधण्याचा अनुभव व आभार पत्र | 187-189 |
| ➢ राज्य संपर्क अधिकारी – महाराष्ट्र शासन –अभिनंदन पत्र - | 190-191 |




135

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA
NILANGA 413 521
Dist. Latur

**(Bridge page)**

In this "शर्मतीर्थ" (Name of the Magazine) Special Biennial NSS Magazine of SRTM University, Nanded. Two articles are written in Marathi Language by our faculty Dr. S. G. Benjalwar. In his first article he had tried to explain how NSS is a School without Chalk and Board. He has poured his both knowledge and experience in writing this article. And in his second article Dr. S. G. Benjalwar tried to explain what is Pfms & ZBSA account which is an essential part of NSS unit in any college. He has shared his understanding of both these concepts' and how to maintain it. The third article is written by our student Miss Late Ashwini who remained a NSS Volunteer. She shared her experience as a student and importance of NSS in shaping life of students.



# ना खडू न फळा रासेयो बिनभिंतीची शाळा

**डॉ. सुभाष बेंजलवार**
रा.से.यो. विभागीय समन्वयक, कार्यक्रमाधिकारी,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या देशातील तरुणाईला विधायक वळण देण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून इ.स. १९६९ ही सुरुवात करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळातील युवकांपुढे आदर्श होता, स्वातंत्र्य चळवळीत समर्पित भावनेने काम करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचा. देशावरील राजकीय गुलामगिरीच्या विरोधात हा देश विभिन्नता असूनही एकवटला होता. या देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये, युवकांमध्ये देशप्रेमाची व सामाजिक बांधिलकीची भावना प्रज्वलित झालेली होती. म्हणून तर या देशातील तरुणांच्या ओठांवर "सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है, देखणा है जोर कितना बाजू ए कातील में है?" हे गीत राज्य करत होते. या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अगदी हसत-हसत बलिदान देणाऱ्या युवकांची पिढी या काळात निर्माण झालेली होती. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर युवकांपुढे हे आदर्श नाहीसे होवून मातृभूमी बद्दलची ही समर्पणाची भावना कमी कमी होत चालली होती. अशा परिस्थितीत या तरुणाईमध्ये पुन्हा एकदा देशसेवा व सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणा निर्माण करणे गरजेचे होते. त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही राष्ट्रीय सेवा योजना अभ्यासपूरक उपक्रम म्हणून सुरु करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्रबिंदू हा युवक आहे, युवकांची जडणघड हा राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य विषय आहे. या अनुषंगाने युवकांची स्पंदने ओळखून राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये याची प्रचीती येते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्देशांमध्ये शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेणारा युवकांमध्ये सामाजिक जाणीवा जागृत करणे हा एक हेतू होता. त्यासाठी महाविद्यालय व परिसरातील सामाजिक व्यवस्था समजावून घेवून समाजासाठी काही एक सृजनात्मक कार्य युवकांनी करावे ही धारणा यामागे होती. युवक हे खऱ्या अर्थाने सृजनशीलतेचे प्रतिक असतात. म्हणून थोर समाजसेवक बाबा आमटे युवकांबद्दल "सृजनशील साहसांना सीमा नसतात" असे म्हणायचे. सृजनशील प्रक्रियेतून युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करणे, विद्यार्थ्यांना समाजाभिमुख बनवणे हाही आणखी एक हेतू यापाठीमागे होता. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य संवर्धन घडवून आणणे आणि लोकशाही शासन व्यवस्थेला पूरक असे नेतृत्वगुण विकसित करून या देशाच्या भवितव्यासाठीचा एक सुजाण नागरिक निर्माण करणे असा उदात्त दृष्टीकोन व तत्कालीन परिस्थितून ही राष्ट्रीय सेवा योजना सुरु करण्यात आली.

खरे पाहता याच उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना वाटचाल करते आहे. परंतु आजही मर्यादित विद्यार्थीच या विचारांच्या परिघात येवू शकतात, याची व्याप्ती वाढण्याची आवश्यकता आहे, ती येत्या शैक्षणिक धोरणातून पूर्ण होईल असे

वाटते. वर्तमान परिस्थिती ही अधिक विदारक बनत चाललेली आहे. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागलेली व मूल्य जपणारी पिढी आता राहिलेली नाही. तेंव्हा ही मूल्य आणि सामाजिक बांधिलकीची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना तेव्हढ्याच सचोटीने करते आहे. केवळ महाविद्यालयात चार भिंतीच्या आत चाललेल्या शैक्षणिक ज्ञान व्यवहाराने विद्यार्थी पदवीधर होईल खरा पण सामाजिक व आत्मभान निर्माण होण्यासाठी चार भिंतीच्या बाहेर पडून अनुभवसिद्ध ज्ञान घेण्याची आवश्यकता असते ती रासेयोतून पूर्ण होते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेला 'ना खडू आणि फळा ती आहे एक बिनभिंतीची शाळा' असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य 'Not Me But You' माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी हे युवकांमध्ये स्वत:साठी जगत असतानाच इतरांसाठी काही एक करण्याची भावना निर्माण करते. वर्गातल्या शिक्षणाने निर्माण होणाऱ्या या भावनेपेक्षा कित्येक पटीने अधिक रासेयोच्या या ब्रीद मधून निर्माण होते. यातूनच सेवेची, समाज व देशाप्रती बांधिलकीची भावना निर्माण होण्यास मदतच होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना वर्तमान स्थितीशी विचार करायला भाग पाडणारे बौद्धिक उपक्रम राबविले जातात त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये वर्तमान परिस्थितीचे नीटपणे आकलन होण्यास मदत होते. त्याच बरोबर राबविल्या जाणाऱ्या श्रमदान शिबिरांमुळे युवकांमध्ये हल्ली कमी होत चाललेले श्रम मुल्य वृद्धिंगत होण्यास मदत होते. ही श्रमदान शिबिरे महाविद्यालय परिसरात व सार्वजनिक ठिकाणी घेतली जातात, त्यामुळे श्रमाचे खरे महत्व विद्यार्थ्यांना कळते आणि विद्यार्थ्यांच्या श्रमदानाकडे पाहून समाजातील काही सामाजिक जाणीव असणाऱ्या लोकांना प्रेरणा मिळते. श्रमदान या रासेयोच्या संकल्पनेत दान हा शब्द महत्वाचा आहे. या संकल्पनेतून दातृत्वाची भावना वृद्धिंगत तर होतेच पण त्याहीपेक्षा मोठे म्हणजे श्रमाचे मूल्य युवकांना कळते. कोणतेही श्रम हे कमी अथवा मौलिक नसते तर त्याची परिणामकारकता ही अधिक महत्वाची असते. रासेयोचे हे श्रम मूल्य श्रम एंव जयते अथवा महात्मा बसवेश्वरांच्या 'कायकवे कैलास' या सिद्धांतानुसार श्रम सिद्धांताला श्रेष्ठत्व प्राप्त करून देणारे ठरते. वर्तमान काळ हा श्रम मूल्य हरवलेला काळ आहे. या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगातही श्रमाची प्रतिष्ठा जपण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेतील श्रमदान या संकल्पनेतून होते. ते भविष्यातही अधिक उपयुक्त ठरणारी बाब आहे.

श्रमसंस्कारासोबतच पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करण्यात रासेयोचा मोलाचा वाटा आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविले जाणारे वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलपुनर्भरण, जलव्यवस्थापन यासारखे उपक्रम वर्तमान कालीन पर्यावरण विषयक समस्यांशी भिडण्याची प्रेरणा युवकांमध्ये निर्माण करतात. आज अत्यल्प पर्जन्यमानामुळे पाणीटंचाईची भीषण समस्या निर्माण झाली आहे. पुन्हा एकदा रेल्वेने पाणी यासारखा दुर्दैवी प्रसंग येतो की काय अशी स्थिती निर्माण होते आहे. या सर्व परिस्थितीवर मात करण्याची क्षमता रासेयो युवकांमध्ये निर्माण करू शकते.

परंतु आधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरण संवर्धनाचे तोकडे उपाय यामुळे यासारख्या समस्या वारंवार निर्माण होत आहेत. रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व विद्यार्थ्यांकडून समाजामध्ये पर्यावरण संवर्धनाचा व जलसाक्षरतेचा विचार पेरण्याचे काम होते आहे. याचा दृश्य उदाहरण म्हणजे रासेयोच्या सहभागातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरात निर्माण झालेले जलसाठे हे होत.

रासेयोच्या विशेष शिबिरे ही खऱ्या अर्थाने बिनभिंतीची शाळा असतात. युवकांना अधिकाधिक समाजाभिमुख करण्याचे काम या विशेष शिबिरांमधून होते. यामुळे ग्रामीण भागापासून लांब चाललेला आजचा हा तंत्रस्नेही युवक गावातील जनतेत मिसळतो, गावातल्या मातीत श्रमदान करतो आणि ही मातीच देशाबाद्दलचा अभिमान त्याच्यात निर्माण करीत असते. म्हणून गावापासून तुटत चाललेल्या तरूणाईला पुन्हा एकदा गावाशी जोडण्याचे काम ही शिबिरे करतात. या शिबिरांमध्ये वर्गाचा अभ्यासक्रम नसतो, तो असतो समाजाचा. वर्गात विद्यार्थी पुस्तक वाचतात, शिबिरात, गावातील माणसे वाचतात, गाव- समाज वाचतात. त्यामुळे युवकांच्या सामाजिक जाणीव पुस्तकी ज्ञानापेक्षाही अधिक प्रगल्भ होतात. यामुळे खऱ्या अर्थाने युवकांची नाळ गावाशी जोडली जाते. शिबिरात सहभागी झालेले अनेक गावांतील युवक शिबिरातून गेल्यानंतर आपल्या गावाशी जुळले जातात. आणि गावासाठी, समाजासाठी काही एक करण्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. अर्थात ही शिकवण मिळते ती बिनभिंतीच्या रासेयो शाळेतून.

रासेयोच्या या बिनभिंतीच्या शाळेचे सारथ्य करणारा कार्यक्रम अधिकारी हा तेव्हढाच महत्वाचा घटक असतो. कारण महाविद्यालयातील पोशाख, दर्जा विसरून शिबिरांमध्ये सहभागी झालेल्या युवकांमध्ये मिसळतो त्यावेळी गुरु-शिष्याच्या नात्यापलीकडचे नाते स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्यात निर्माण होते. यामुळे चार भिंतीच्या पलीकडे जावून हा विद्यार्थी शिक्षक सुसंवाद वाढतो. याच सुसंवादातून उद्याच्या उज्वल भारताची नांदी तयार होते. महाविद्यालयातील शिक्षकांचा सहवास हा केवळ वर्गापुरता मर्यादित असतो, परंतु वर्गाच्या पलीकडे जावून शिबीर कालावधीतील हा सहवास सामाजिक आणि भावनिक नाते वृद्धिंगत करणारा असतो. म्हणून भिंतीच्या शाळेपेक्षा, अभ्यासक्रम विरहीत, खडू-फळा विरहीत रासेयोची बिनभिंतीची शाळा युवकांमध्ये स्वावलंबन, चारित्र्यसंवर्धन, श्रमसंस्कार व सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करणारी देशाचे भविष्य उज्वल करणारी शाळा आहे.... यातूनच देशाचे नेतृत्व करणाऱ्या पिढ्यांची निर्मिती होवो ही सदिच्छा....

MAHARASHTRA MAHAVIDYALAYA
NILANGA
413 521
Dist. Latur

**(Bridge page)**

Above article is written in Marathi Language. In it the author our faculty Dr. S. G. Benjalwar tried to explain how NSS is a School without Chalk and Board. He has poured his both knowledge and experience in writing this article.

Articles blow are written in Marathi Language:

1) In first article the author our faculty Dr. S. G. Benjalwar tried to explain what is Pfms & ZBSA account which is an essential part of NSS unit in any college. He has shared his understanding of both these concepts' and how to maintain it.
2) The second article is written by our student Miss Late Ashwini who remained a NSS Volunteer. She shared her experience as a student and importance of NSS in shaping life of students.

Article by Dr. S.G. Benjalwar

# PFMS प्रणाली : एक अनुभव



**डॉ. सुभाष बेंजलवार**
रासेयो कार्यक्रमाधिकारी
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यक्रम अधिकारी म्हणून काम करताना pfms हा शब्द अनभिज्ञ होता. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या जानेवारीमध्ये प्रथमता या प्रणाली बद्दल सूचना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो विभागाकडून प्राप्त झाली. pfms समजून घेईपर्यंत ZBSA या खाते प्रकारची सूचना आली. खरे पाहता वाणिज्य शाखेशी आणि बँकिंग व्यवहाराशी फारसा संबंध नसलेल्या कला शाखेचा विद्यार्थी राहिलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीसाठी या दोन्ही गोष्टी नवीन होत्या. आतापर्यंत सेव्हिंग आणि करंट हे दोनच खाते प्रकार माहित होते. रासेयो मुळे ZBSA या नव्या खाते प्रकाराची माहिती मिळून ज्ञानात भर पडली. खाते काढल्यानंतर सगळा प्रश्न मिटणार नव्हता. तर ते खाते PFMS प्रणालीतून मॅपिंग करून घेणे, एजन्सी लॉगीन, डेटा ऑपरेटर आणि डेटा ओपरोव्हर यासारखे कधीच न ऐकलेले शब्द विद्यापीठाच्या सततच्या सूचनांमधून वाचनात आले. विद्यापीठाचे नवनियुक्त रासेयो संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्याकडून सूचनांचा भडीमार होत असे. प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचून समजावून घेण्याचा प्रयत्न करून हे नवे शब्द त्यांचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न मी करत होतो.

सुदैवाने आमच्या महाविद्यालयात UGC आणि ICSSR च्या अनुदानांच्या प्रक्रियेमुळे आमचे सहकारी श्री संतोष तोरसल्ले यांना याबद्दल थोडीफार माहिती होती. मी सुरुवातीला त्यांना विचारत होतो, त्यांना माहित आहे ते मला सांगत होते. परंतु मी इतिहासाचा शिक्षक, मला सनावळ्या ऐतिहासिक नावे लक्षात राहतात पण हे बँकिंग प्रणालीचे शब्द माझ्यासाठी अवघड जात होते. परंतु आपण हे शिकले पाहिजे या जिद्दीने PFMS प्रणाली त्यांतर्गत एजन्सी लॉगीन, डेटा ऑपरेटर आणि डेटा ओपरोव्हर या गोष्टी शिकून घेण्याचा प्रयत्न केला. थोडेफार संगणक ज्ञान यावेळी फार उपयोगी पडले. त्यात युट्युब हा एक उत्तम शिक्षक होता. करजगी सरांनी PFMS प्रणाली साध्या सोप्या भाषेत समजणारे अनेक युट्युब व्हिडीओ वाटसपवर पाठवले होते.ते पाहून एकूण काही गोष्टी समजल्या. त्या समजावून घेताना सवयीप्रमाणे नोट्स काढल्या, त्या पुन्हा पुन्हा वाचल्या आणि प्रात्यक्षिक करून घेवून समजावून घेतल्या. त्यानुसार मला काही बाबी कळाल्या- PFMS या शब्दाचा अर्थ Public Financial Management System असा आहे. मराठी मध्ये याला सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन सेवा (पीएफएमएस) या नावाने ओळखले जाते. PFMS ही एक अशी प्रणाली आहे जिच्या मदतीने सरकारकडून दिले जाणारे अनुदान थेट वापरकर्त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात.

PFMS ही एक प्रकारची स्वयंचलित प्रणाली आहे. ज्यामध्ये कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय लाखों रुपये फक्त एका क्लिकवर वापरकर्त्यांच्या Bank Accounts मध्ये पाठविले जातात.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आर्थिक वर्षाच्या मार्च महिन्याच्या शेवटी ३० तारखेला ZBSA खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होणार होती. आणि ती ३१ मार्चच्या रात्री १२.०० वाजेपर्यंत जर EPPA द्वारे आपण काढून घेवू शकलो नाही तर अनुदानाची रक्कम परत जाणार होती. ती पुन्हा मिळेल का नाही याबद्दल अनिश्चितता होती. त्यात संचालक करजगी सरांनी एक यादी ग्रुपवर टाकून सदरील महाविद्यालयांच्या ZBSA खात्यावर रक्कम झाली असून ती ३१ मार्चच्या आत काढून घ्या अशी सूचना टाकली, अन त्या यादीत आमच्या महाविद्यालयाचे नावच नव्हते. मी शेवटचा दिवस आहे, आरपारची लढाई आहे या भावनेने सकाळी कॉलेजमध्ये गेल्यापासून ऑफिसमध्ये laptop उघडून बसलो होतो.आमचे सहकारी श्री संतोष तोरसल्ले यांना विचारत होतो, परंतु आमच्या खात्यावर पैसेच दिसत नव्हते. त्यामुळे PFMS प्रणाली समजून ही मी काहीच करू शकत नव्हतो. आमच्या महाविद्यालयातील YCMOU च्या रासेयो युनिटचे पैसे त्यांच्या खात्यावर दिसत होते ते प्रयत्न करत होते पण त्यांना ते व्हेंडर च्या खात्यावर वर्ग करण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या. मी



141

Article by student Mayuri Late

# राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी जीवनास वळण देणारे दिवस



**कु. मयुरी लाटे**
रासेयो स्वयंसेविका
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

मी महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथे माझ्या बी. ए.द्वितीय व तृतीय वर्षात असताना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये होते. राष्ट्रीय सेवा योजनेतून मला माझ्या जीवनाला एक निश्चित असे वळण मिळाले. सामाजिक कार्याची प्रेरणा मिळाली.

घरापासून दूर आयुष्य मला NSS मुळे समजून घेता आले .सर्वात महत्त्वाचे म्हणजे या समाजाला मी काही तरी देणे लागते ही भावना माझ्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमुळे निर्माण झाली. वार्षिक विशेष शिबिराच्या माध्यमातून मला माझ्यातील लीडरशीप स्किल समजून घेता आली . समाजात राहून समाजासाठी, समाज विकासासाठी माझी काय भूमिका आहे. माझ्या मध्ये समाजातील अडचणी वेगळया अर्थाने समजून घेण्याची रुची या कामातून आली .

या दरम्यान मला विद्यापीठ स्तरीय व राज्यस्तरीय शिबिरात सहभाग घेण्याची संधी प्राप्त झाली. त्यामुळे मला घरातून पहिल्यांदा बाहेर पडण्याची संधी मला राष्ट्रीय सेवा योजनेनेच दिली . त्यामुळे मला माझ्या भविष्याचे कार्यक्षेत्र निवडण्यासाठी व घराबाहेर पडून काही एक सामाजिक कार्य करण्याची संधी मिळाली, याचे सर्व श्रेय राष्ट्रीय सेवा योजनेचेच आहे असे मला आवर्जून म्हणावे वाटते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांतील वकृत्व स्पर्धामधून माझ्यात बोलण्याचे धाडस निर्माण झाले, रांगोळी, पोस्टर्स यासारख्या स्पर्धांमधून माझ्यातील कला गुणांना वाव मिळाला. तर ब्लड डोनेशन कॅम्प मध्ये सहभाग घेणे यामुळे सामाजिक बांधिलकीची भावना माझ्यात निर्माण झाली. यामुळेच NSS च्या स्वयंसेवकांनी मिळून आमच्या महाविद्यालयातील अमोल वाघमारे या स्वयंसेवक मित्राचा अपघात झाला, त्यावेळी त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती उपचाराचा खर्च करण्याची नाही हे पाहून आम्ही एकत्रित येवून लोकवर्गणीतून खर्च भागेल एवढी रक्कम उभी केली. त्यामुळे तो जवळपास दोन महिन्यानंतर दवाखान्यातून बरा होवून आमच्यात येऊ शकला. कदाचित आमच्यावर NSS चे संस्कार महाविद्यालयात झाले नसते तर आम्ही हे काम करू शकलो नसतो. ही सामाजिक बांधिलकीची भावना आमच्यात निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेनेच केले हे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.



152